# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 14.05.2024** **वार–मंगळवार**

---

**मतदान**

केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या अंतिम आकडेवारीनुसार पुणे शहर लोकसभा मतदार संघात काल ५३ पूर्णांक ५४ शतांश टक्के मतदान झालं. एकंदर २० लाख ६१ हजार २७६ मतदारांपैकी ११ लाख ३ हजार ६७८ मतदारांनी मतदानाचा आपला हक्क बजावला. त्यात ५ लाख ८४ हजार ५११ पुरुष मतदार तर ५ लाख १९ हजार ७८ महिला मतदार आणि ८९ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. कसबा पेठ विधानसभा मतदार संघात सर्वाधिक म्हणजे तब्बल ५९ पूर्णांक २४ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली असून सर्वात कमी म्हणजे ५० पूर्णांक ६७ शतांश टक्के मतदान शिवाजी नगर मतदार संघात झालं आहे. पर्वती मतदार संघातील ५५ पूर्णांक ४७ शतांश टक्के मतदारांनी तर पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघातील ५३ पूर्णांक १३ शतांश टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. कोथरूड मतदार संघात ५२ पूर्णांक ४३ शतांश टक्के आणि वडगाव शेरी मतदार संघात ५१ पूर्णांक ७१ शतांश टक्के मतदान झाल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. गेल्या निवडणुकीत पुणे शहर मतदार संघात एकंदर ४९ पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. यावेळच्या निवडणुकीत त्यात केवळ ३ पूर्णांक ६५ शतांश टक्के वाढ झाल्याचं दिसून आलं आहे.

दरम्यान, मतदानाचा टक्का वाढण्यासाठी स्थानिक प्रशासनानं अथक प्रयत्न केले. मतदारांनी मतदान केंद्रापर्यंत येण्यासाठी विविध योजना राबवल्या.

**मतदान केंद्र**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं काल पिंपळे सौदागर, पिंपरी आणि काळेवाडी या भागात उद्यान विभागाच्या वतीनं हरित मतदान केंद्र उभारण्यात आली होती. यामध्ये दुर्मिळ वनस्पती ,आयुर्वेदिक बीजांची माहिती देणारे फलक आणि छोटेखानी वृक्ष वाटिका बनवण्यात आली होती. या मतदान केंद्रांवर मतदान करणाऱ्यांना रोपांचं वाटप करण्यात आलं. ज्या नागरिकांनी मतदान केलं मात्र ज्यांना रोपं मिळाली नाहीत अशांनी महापालिकेच्या उद्यान विभागाकडे संपर्क साधण्याचं आवाहन उद्यान विभागानं केलं आहे.

**जयंती**

छत्रपती संभाजी महाराजांची जयंती आज राज्यभरात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त पुण्यात विविध ठिकाणी कार्यक्रम संपन्न झाले. पुणे विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात कुलगुरू प्रा डॉक्टर सुरेश गोसावी यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

**रक्तसाठा कमी**

उन्हाळी सुट्ट्यांमुळे पुणे शहरातील रक्तदान शिबिरांची संख्या घटल्यानं रक्तपेढ्यांमधला रक्तसाठा निम्म्यावर येऊन ठेपला आहे. काही रक्तपेढ्यांमध्ये पाच दिवस, तर काही ठिकाणी एका आठवड्याचा रक्तसाठा शिल्लक आहे. त्यासाठी येत्या काही दिवसांत रक्तदान शिबिरं आयोजित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचं ससून रक्तपेढी प्रमुख डॉ. सोमनाथ खेडकर यांनी सांगितलं.

**मैलापणी**

पुणे महापालिकेतर्फे 840 कोटींचा मैलापाणी शुद्धीकरण सुधारित प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून अमृत योजनेअंतर्गत मान्यता मिळवण्यासाठी तो राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. महापालिका हद्दीत निर्माण होणाऱ्या मैलापाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 6 केंद्र कार्यरत आहेत. त्याची क्षमता 477 एमएलडी इतकी आहे. मात्र हे प्रकल्प जुन्या नियमावली नुसार असून 15 वर्ष जुने आहेत. त्याच्या नवीनीकरणा साठी हा सुधारित अहवाल सादर केला आहे.

**घरचे बियाणे**

आगामी खरीप हंगामात सोयाबीन ग्राम बीजोत्पादन कार्यक्रमांतर्गत 'घरचे बियाणे' मोहीम राबवण्यात येत आहे. त्यादृष्टीनं तालुका कृषी अधिकारी कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. गावपातळीपर्यंत या मोहिमेसाठी प्रयत्न करण्यात येत असून अधिकाधिक क्षेत्र या पिकाखाली आणायला प्राधान्य देत असल्याची माहिती पुणे विभागीय कृषी सहसंचालक रफिक नायकवडी यांनी दिली.

**'मनरेगा'**

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सलग तीन वर्षे फळबागांखाली अधिकाधिक क्षेत्र आणण्यास कृषी विभागाला यश आलं आहे. मनरेगातून सुमारे 60 हजार हेक्टरवर फळबाग, फुलं तसंच वृक्षांची लागवड करण्याचं उद्दिष्ट 2024-25 मध्ये निश्चित करण्यात आलं आहे. त्यादृष्टीनं नियोजनबद्ध पद्धतीने ही मोहीम यशस्वी करण्याच्या सूचना पुणे कृषी विभागाचे फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी सर्व विभागीय कृषी सहसंचालकांना दिल्या आहेत.

**क्रिकेट**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं चंचला कोद्रे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'सीएसके करंडक' आंतरक्लब खुल्या टी-२० क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत अद्वय सिधये याच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर एमईएस संघानं वैलिया संघाचा ७९ धावांनी पराभव केला. अन्य दुसऱ्या सामन्यात यासार शेख याने फटकावलेल्या ९५ धावांच्या जोरावर रिस्क्राईब अ‍ॅकॅडमीने पनवेलच्या लवास रॉयल्स्चा ४४ धावांनी पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज तुरळक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कमाल तापमान 37 तर किमान तापमान 22 पूर्णांक 7 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटु संध्याकाळी 6 वाजता विविधभारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**